पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
**मा.महिला व बालकल्याण समिती**
कार्यपत्रिका क्रमांक - **०४**
**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/०१/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **१४/०१/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
३. मा.सविता बाळकृष्ण खुळे
४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र
५. मा.मंगला अशोक कदम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) ठराव क्र.०५ दिनांक २४/१२/२०२० मध्ये दुरुस्ती करणेबाबत.- मा.माधवी राजापुरे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) महिला बचत गटांसाठी कर्ज रक्कमेच्या मर्यादेत कर्ज रक्कमेवर प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य देणेबाबत.- मा.योगिता नागरगोजे, मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) जागतिक महिला दिन साजरा करणेकामी येणा-या खर्चाबाबत.- मा.माधवी राजापुरे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पवनाथडी जत्रा आयोजन व खर्चास मान्यता देणेबाबत.- मा.सविता खुळे, मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सामुदायिक विवाह सोहळयाबाबत.- मा.योगिता नागरगोजे, मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) महिला व बालकल्याण अंतर्गत चादर,बॅरेक कंबल ,दरी पंजा बेडशिट संच,पिलो कवर वाटप करणे तसेच अंदाजपत्रकाबाबत.–मा. योगिता नागरगोजे, मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) मनपा शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटर कुलर बसविणेकामीच्या तरतूदीबाबत.– मा.योगिता नागरगोजे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

------------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.सविता खुळे                    अनुमोदक - मा.माधवी राजापुरे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.महिला व बालकल्याण समिती (कार्यपत्रीका क्रमांक ०४) दिनांक १४.०१.२०२१ रोजीची पाक्षिक सभा दिनांक १५.०१.२०२१ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - शुक्रवार दि.१५/०१/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
**मा.महिला व बालकल्याण समिती**
कार्यपत्रिका क्रमांक - **०४**
**सभावृत्तांत**
**( दिनांक १४/०१/२०२१ ची तहकूब सभा)**

दिनांक - **१५/०१/२०२१** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक १४/०१/२०२१ ची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक **१५/०१/२०२१** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
३. मा.सविता बाळकृष्ण खुळे
४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र
५. मा.मंगला अशोक कदम

या शिवाय मा.चारठाणकर – उप आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पाटील – प्राचार्य (आयटीआय), मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक २४/१२/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक **०३**) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ८ विषय क्रमांक - ०१
दिनांक – १५/०१/२०२१
सुचक :- मा.माधवी राजापुरे अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे
संदर्भ – मा.माधवी राजापुरे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.०५ दिनांक २४/१२/२०२० मध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. “नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. यामध्ये विधवा महिलांना पुर्नविवाहानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य आणि विधवा महिलांच्या मुलींना लग्नानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य या दोन नवीन योजना सोबतच्या प्रपत्र “अ” आणि “ब” नुसार राबविणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९ विषय क्रमांक - ०२
दिनांक – १५/०१/२०२१
सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.माधवी राजापुरे
संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या संख्येने बचतगट कार्यरत आहेत. या बचतगटांसाठी नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत काही कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. परंतु या बचतगटांनी उद्योग व्यवसाय करण्यासाठी बँकांकडून कर्ज घ्यावे व त्यायोगे बचतगटातील महिला आत्मनिर्भर व्हाव्यात यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तरी या हेतूने पिंपरी चिंचवड शहरातील महिला बचतगटांनी राष्ट्रीयकृत / सहकारी बँकांकडून र.रु.२,००,०००/- पर्यंत कर्ज घेतल्यास त्यांना या र.रु.२,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन लाख रूपये) कर्ज रकमेच्या मर्यादेत

त्या मंजूर कर्ज रक्कमेवर २५% प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य बचतगटांना देण्यास व सदरची तरतूद महिला बालकल्याण योजनेअंतर्गत असणा-या दिड वर्ष कार्यरत महिलांचे बचतगटांना अर्थसहाय्य व दहा वर्षे पूर्ण झालेल्या महिला बचतगटांना अर्थसहाय्य या लेखाशिर्षातून करण्यास व याबाबतच्या अटी व शर्ती विभागामार्फत करण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक - ०३

दिनांक – १५/०१/२०२१

सुचक :- मा.माधवी राजापुरे अनुमोदक : सविता खुळे

संदर्भ – मा.माधवी राजापुरे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत दरवर्षी जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो. त्याचप्रमाणे यावर्षी देखील ८ मार्च २०२१ या जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यास व त्याकामी येणा-या र.रु. ३,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन लाख रूपये फक्त) च्या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - ०४

दिनांक – १५/०१/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : माधवी राजापुरे

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.माधवी राजापुरे, यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतुने दरवर्षी पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात येते. तरी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी पी.डब्ल्यु.डी. ग्राऊंड, सांगवी येथे फेब्रुवारी महिन्यातील शेवटच्या आठवड्यामध्ये आयोजन करण्यास तसेच त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - ०५

दिनांक – १५/०१/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : माधवी राजापुरे

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.माधवी राजापुरे, यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. मुला/मुलींच्या लग्नाकरीता सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केल्यास अशा संस्थांना प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य देणे. तसेच या विवाह सोहळ्यात सहभागी होणा-या जोडप्यांना अर्थसहाय्य देणे. हि योजना सोबतचे प्रपत्र "अ" नुसार राबविणेकामी मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक - ०६

दिनांक – १५/०१/२०२१

सुचक - मा.योगिता नागरगोजे अनुमोदक – मा.माधवी राजापुरे

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील घोषित अघोषित झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व महिलांना त्यांचे कुटुंबाच्या नावे असलेला फोटोपास अथवा स्वतःचे आधारकार्ड यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य मानून त्या आधारे रोज वापरासाठी शासन दर करातील अनु क्र.९ क प्रमाणे दोन चादर व अनु क्र. ८ ब प्रमाणे २ बॅरेक कंबल व अनु.क्र. ५ अ प्रमाणे २ दरी पंजा व अनु क्र. ३ अ प्रमाणे २ बेडशिट संच, २ पिलो कवर हा प्रत्येक महिलेस वरील प्रमाणे १ संच ( २ चादर , २ कंबल, २ पिलो कवर, व २ दरी पंजा व २ दरी बेडशिट ) उपलब्ध करून देणेकामी महाराष्ट्र हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, पंतनगर गार्डन व्हू को- ऑप हौसिंग सोसायटी लि. शशांक २२५/५९५ पंतनगर, घाटकोपर ( पूर्व) मुंबई – ४०० ०७५ यांचेकडून शासनाच्या दर करारानुसार खरेदी करून उपलब्ध करुन देणेस व त्याकामी सर्व खर्च नागरवस्ती व विकास योजना विभागाकडील २०२०-२१ या अंदाजपत्रकातील पान क्र.४४१ मधील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशीर्ष अनु.क्र.३९ इतर योजना / कार्यक्रम या उपलेखाशिर्षावरील तरतुदीमधून करणेस तसेच त्याकामी लाभार्थींच्या संख्येत वाढ झाल्यास ३१/०३/२०२१ अखेर पर्यंतच्या कालावधीत सदर योजना राबविणेकामी आवश्यकतेनुसार इतर लेखाशिर्षावरील अखर्चित / शिल्लक रक्कमेमधून रक्कम नागरवस्ती व विकास योजना विभागातील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष पान क्र.४४३ अनु क्र.११ इतर योजना / कार्यक्रम या लेखाशीर्षावर वेळोवेळी प्राधान्याने वर्ग करणेस अथवा सुधारित अंदाजपत्रकात याकामी आवश्यक तरतूद उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर कामास महानगरपालिका कलम क्र.६६ अन्वये मान्यता देणेत येत आहे. उपरोक्त संस्थेबरोबर करारनामा करणेस व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास तसेच उक्त ठरावामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन मान्य दर करारानुसार अनु.क्र. ९ क प्रमाणे २ चादर व अनु क्र.८ ब प्रमाणे २ बॅरेक कंबल व अनु.क्र. ५ अ प्रमाणे २ दरी पंजा, अनु.क्र. ३ अ प्रमाणे २ बेडशिट संच, २ पिलो कव्हर व त्यामध्ये जादाचे २ बेडशीट ६ पिलो कव्हर अधिक करून सदरचा संच हा प्रत्येक महिलेस वरील प्रमाणे १ संच ( २ चादर,२ बॅरेक कंबल, ४ बेडशिट, ८ पिलो कव्हर, २ दरी पंजा) ही दुरुस्ती करून साहित्य वाटप करण्यासाठी लागणारी तरतूद सन २०२०-२१ च्या महिला व बालकल्याण विभागाच्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये पान क्र. ४४१ महिला व बालकल्याण योजना अंतर्गत अनु.क्र. ३९ इतर / योजना कार्यक्रम या उपलेखाशिर्षावरील व तसेच महानगरपालिकेच्या इतर कल्याणकारी योजनेतील पान क्र. ४४३ अनु.क्र. ११ मधील उपलेखाशीर्ष इतर / योजना कार्यक्रम हया वर उपलब्ध रक्कम व अखर्चित रक्कम या विभागाची अथवा इतर विभागामार्फत उपलब्ध खर्चित रक्कम उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच याकामी ४० कोटी रक्कम मा. स्थायी समिती मार्फत उपलब्ध करून मिळावी व सदरचे साहित्य सर्व शहरातील घोषित व अघोषित झोपडपट्टीमधील सर्व महिलांना सदर साहित्याचा लाभ मिळावा तसेच आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करून मिळावा तसेच सदरची खरेदी महाराष्ट्र हातमाग सहकारी महासंघ मर्यादित,पंतनगर गार्डन व्हू को- ऑप हौसिंग सोसायटी लि.शशांक २२५/५९५ पंतनगर, घाटकोपर ( पूर्व) मुंबई – ४०० ०७५ अथवा महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित ( महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय ) नेरूळ ( पश्चिम) नवी मुंबई- ४०० ७०६ यांच्यामार्फत करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक - ०७

दिनांक – १५/०१/२०२१

सुचक - मा.योगिता नागरगोजे अनुमोदक – सविता खुळे

संदर्भ - मा.योगिता नागरगोजे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिकेच्या शिक्षण विभागाकडील सर्व बालवाड्या, सर्व प्राथमिक शाळा व सर्व माध्यमिक शाळांमध्ये वॉटर

फिल्टर व वॉटर कुलर (एकत्रित युनिट) बसविणेस याबाबतची सर्व प्रशासकीय कार्यवाही व साहित्य वाटप प्राथमिक शिक्षण विभागाकडून करणेस तसेच सदरची खरेदी विहित नियमानुसार भांडार विभागाकडून करणेस तसेच याकामी आवश्यक असणारी तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत 'मदर तेरेसा- शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील/ प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगिण विकासात्मक योजना' या उपलेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुदीमधून करणेस मान्यता देण्यात येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३१/२०२१
दिनांक : २०/०१/२०२१



**(** उल्हास बबनराव जगताप **)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

( विषय क्रमांक ०१ शी संलग्न )

# महिला बाल कल्याण योजना
## प्र पत्र अ

❖ **योजनेचे नाव** – **महर्षी धोंडो केशव कर्वे विधवा महिलांना पुनर्विवाहानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य.**

❖ **योजनेचे स्वरूप** – पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील विधवा महिलांनी पुनर्विवाह केल्यास त्यांना संसार उपयोगी साहित्य घेणेकामी र.रू. २५,०००/- अर्थसहाय्य देणे.

❖ **अटी व शर्ती** –

- अर्जदार महिलेने अर्जासोबत आधारकार्डची सत्यप्रत जोडणे बंधनकारक. ( आधारकार्ड हे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील असणे आवश्यक )
- अर्जदार महिलेने अर्जासोबत मतदार ओळखपत्र / मतदार यादीची प्रत या दोन्हींपैकी एक अतिरिक्त पुरावा म्हणून जोडणे आवश्यक.
- अर्जदार विधवा महिलेने अर्जासोबत पतीच्या मृत्यू प्रमाणपत्रची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.
- पुनर्विवाह केलेनंतर विवाह नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक.
- सदर योजनेचा लाभ हा पुनर्विवाह केल्यानंतर ६ महिन्यांच्या आत घेणे आवश्यक आहे.

## महिला बाल कल्याण योजना
## प्र पत्र ब

❖ **योजनेचे नाव – महर्षी धोंडो केशव कर्वे विधवा महिलांच्या मुलींना लग्नानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य देणे .**

❖ **योजनेचे स्वरूप –** विधवा महिलांच्या मुलींना लग्नानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी र.रू. २५,०००/- अर्थसहाय्य देणे.

❖ **अटी व शर्ती –**

- अर्जदार महिलेने अर्जासोबत आधारकार्डची सत्यप्रत जोडणे बंधनकारक. ( आधारकार्ड हे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील असणे आवश्यक ) तसेच आधारकार्ड हे आई आणि मुलगी दोघींचे जोडावे .
- अर्जदार महिलेने अर्जासोबत रेशनकार्ड जोडणे आवश्यक रेशनकार्डात आईचे व मुलीचे नाव असणे आवश्यक. ( रेशनकार्ड हे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील असणे आवश्यक )
- अर्जदार महिलेने अर्जासोबत मतदार ओळखपत्र / मतदार यादीची प्रत या दोन्हींपैकी एक अतिरिक्त पुरावा म्हणून जोडणे आवश्यक. ( आई आणि मुलगी दोघींचे )
- विवाहीत मुलीचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक.
- अर्जदार विधवा महिलेने अर्जासोबत पतीच्या मृत्यू प्रमाणपत्रची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.
- अर्जदार विधवा महिलेने मुलीच्या लग्नानंतर ६ महिन्यांच्या आत सदर योजनेचा लाभ घेणे आवश्यक आहे.
- अर्जदार विधवा महिलेच्या पहिल्या दोन मुलींसाठी सदरचे अर्थसहाय्य देण्यात येईल.

**(विषय क्र.०५ शी सलंग्न)**

**प्रपत्र – "अ"**

**योजनेचे नाव -** सामुदायिक विवाह सोहळ्यात सहभागी होणा-या वधु व वरांसाठी र.रु.१५,०००/- व सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करणा-या संस्थेस प्रोत्साहन पर र.रु.१५,०००/- अर्थसहाय्य देणे.

**अटी/शर्ती -**

१) सदर योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे राबविणेत येणार असल्याने दांपत्यांपैकी (वर व वधु पैकी) एक जण पिंपरी चिंचवड हद्दीतील रहिवासी असणे आवश्यक आहे.

२) दांपत्य सज्ञान असावे वराचे वय २१ व वधुचे वय १८ वर्षपिक्षा कमी नसावे. त्याबाबत पुरावा उदा. शाळा सोडल्याचा दाखला, वयाचा दाखला इत्यादी सादर करावे.

३) वधु व वर यांचे प्रथम विवाहासाठीच अनुदान देय राहील.

४) वधु व वराचे आधारकार्ड आवश्यक राहील. पैकी एकाचे आधारकार्ड पि.चि.मनपा हद्दीतील आवश्यक राहिल

५) सामुहिक विवाह सोहळ्या मध्ये भाग घेणा-या दांपत्यांना देण्यात येणा-या अनुदान र.रू.१५,०००/- ही रक्कम वधुचे वडील, आई किंवा पालकांच्या नावे धनादेश/ECS द्वारे विवाहाचे दिवशी अदा करणेत येईल.

६) सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणा-या स्वयंसेवी संस्थांना प्रति पात्र जोडपे र.र.१५,०००/- प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येईल.

७) सामुदायिक विवाह सोहळ्यात सहभाग घेणा-या जोडप्यांची संख्या किमान १० असणे आवश्यक आहे.

८) सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करणा-या संस्थेने विहीत नमुन्यातील अर्ज विवाह संपन्न होण्याच्या १५ दिवस अगोदर नागरी सुविधा केंद्रामध्ये जमा करणे आवश्यक राहील.

९) सामुहिक सोहळा आयोजित करणा-या स्वंयसेवी संस्थेने विवाह झालेनंतर ०३ महिन्याचे आत विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर केले नंतर सदर संस्थेचे अनुदान ECS द्वारे अदा करणेत येईल.

१०) सदर योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे राबविणेत येणार असल्याने संस्था पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील असणे आवश्यक राहील.

११) सदरची संस्था हि शासन नोंदणीकृत असणे बंधनकारक राहील. तसेच संस्थेची नोंदणी, किमान ०५ वर्षापुर्वी झालेली असावी. संस्थेने मागील ०३ वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल जोडणे आवश्यक राहील.

१२) स्वयंसेवी संस्था ही द सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नुसार सहकारी तत्वावर व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८५० अंतर्गत नोंदणीकृत असले बाबत पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

सही/-
(लोखंडे चंदा राजू)
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.